# महाराष्ट्र विधानपरिषद

## द्वितीय (अर्थसंकल्पीय) अधिवेशन, २०२४

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

### प्रश्नांची एकूण संख्या - २०

### वायशेत (ता.जि.अलिबाग) येथील प्राथमिक शाळेतील शिक्षक पंचायत समितीमध्ये सांख्यिकी स्वरूपाचे काम करीत असल्याबाबत

**(१) १४२६५ (२०-०४-२०११) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वायशेत (ता.जि.अलिबाग) येथील प्राथमिक शाळेतील काही शिक्षक गत चार वर्षापासून गट शिक्षण अधिकारी यांच्या आदेशावरुन पंचायत समितीमध्ये सांख्यिकी स्वरुपाचे काम करीत असल्याबाबत तत्कालीन गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती, अलिबाग यांच्याकडून खुलासा मागविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गट शिक्षणधिकारी पंचायत समितीकडून प्राप्त झालेल्या खुलाशात काय अढळून आले व त्यानुसार सदर शिक्षकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (०९-११-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) शासनाने शासन परिपत्रक दिनांक ०१/११/२०२२ अन्वये विनाअनुदानित जागेवरून अनुदानित जागेवर शिक्षकांच्या बदलीस स्थगिती दिली असून, याप्रकरणी राज्यात झालेल्या गैरप्रकाराची चौकशी करण्याबाबत आयुक्त (शिक्षण) यांना निर्देशित केले आहे. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बदली संदर्भात शासन स्तरावर उचित निर्णय घेण्याची कार्यवाही सुरू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सफाळे (ता.जि.पालघर) आगाराचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत

**(२) १७०९५ (२५-०३-२०२३) श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे सफाळे (ता.जि.पालघर) आगार उभारण्याचे बांधकाम गत पाच वर्षांपासून प्रशासन आणि ठेकेदाराच्या दुर्लक्षामुळे रखडले असल्याने प्रवाशांची गैरसोय होत असल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकारणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे सफाळे आगार उभारण्याचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२३-०१-२०२४) :** (१), (२) व (३) सफाळे आगारांतर्गत येणाऱ्या जीर्ण व धोकादायक झालेल्या बसस्थानक इमारतीचे तोडकाम करुन रा.प.सफाळे बसस्थानक पुनर्बांधणीच्या कामाचा कार्यादेश कार्यकारी अभियंता, रा.प.मुंबई प्रदेश यांच्या कार्यालयातील कार्यादेश दिनांक १८/०७/२०१९ रोजी यांस देण्यात आला आहे.

परंतु, वाहतूकीच्यादृष्टीने नकाशातील फेरदुरुस्ती, कोविड-१९ महामारी, अपुरी कामगार उपलब्धता इ.कारणांमुळे सदरचे काम विहित मुदतीत पूर्ण झालेले नाही. सद्य:स्थितीत सदरचे ५०% काम पूर्ण झाले असून प्रवासी प्रतिक्षागृहावरील स्लॅब भरणीचे काम प्रगतीपथावर आहे.

---

## राज्यातील समाजकार्य महाविद्यालायातील कर्मचाऱ्यांना करिअर ॲडव्हान्समेंट स्कीम चे लाभ ७ व्या वेतन आयोगानुसार मिळणेबाबत

**(३) १९५९२ (०८-०८-२०२३) श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सामाजिक न्याय विभागांतर्गत येत असलेल्या समाजकार्य महाविद्यालायातील कर्मचाऱ्यांना करिअर ॲडव्हान्समेंट स्कीम (CAS) चे लाभ ७ व्या वेतन आयोगानुसार मिळत नसल्याची बाब माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सामाजिक न्याय विभागातर्गत येत असलेल्या समाजकार्य महाविद्यलयातील कर्मचाऱ्यांना करिअर ॲडव्हान्समेंट स्कीम (CAS) चे लाभ ७ व्या वेतन आयोगानुसार मिळणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०६-०२-२०२४) :** (१) होय
(२) मा.मंत्रिमंडळाच्या मान्यतेनुसार दिनांक २२/१०/२०२१ च्या शासन निर्णयान्वये समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर समकक्ष संवर्गातील ७ वा वेतन आयोगाच्या सुधारीत वेतन श्रेणी लागू करण्यात आल्या आहेत.

सदर शासन निर्णयान्वये करिअर ॲडव्हान्समेंट स्कीम (CAS) बाबत स्वतंत्रपणे निर्णय घेण्यात येईल असे नमूद केले आहे. त्यानुसार समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक यांना करिअर ॲडव्हान्समेंट स्कीम (CAS) लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## राज्यातील पत्रकारांसाठी कल्याणकारी महामंडळ स्थापन करण्याबाबत

**(४) २०५७४ (०९-०८-२०२३) श्री.धीरज लिंगाडे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ८५ टक्के पत्रकारांना रुपये २० हजार इतके कमी वेतन मिळत असून त्यामध्ये कुटूंबियांचा उदरनिर्वाह चालविणे कठीण असल्याने पत्रकारांना जोडधंदा करण्यासाठी बँकांकडून कर्जहीमिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोकशाहीच्या चौथा स्तंभ म्हणून काम करणाऱ्या पत्रकारांना कर्ज उपलब्ध व्हावे यासाठी अण्णसाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या धर्तीवर पत्रकार कल्याणकारी महामंडळ स्थापन करण्यासाठी कार्यवाही करणार आहे काय,

(३) असल्यास, पत्रकार कल्याणकारी महामंडळ स्थापन करण्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०५-०२-२०२४) :** (१) सदरची बाब महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०२३ च्या दुसऱ्या अधिवेशनात उपस्थित करण्यात आलेल्या विधानपरिषदेतील लक्षवेधी सूचना क्र. २१ च्या अनुषंगाने शासनाच्या निर्देशनास आली आहे.

(२) शासनस्तरावर याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन नाही. तथापि, उक्त लक्षवेधी सूचनेबाबत दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने पत्रकारांच्या विविध समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी एक अभ्यासगट स्थापन करण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे. तसेच, शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधीमधून बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजनेंतर्गत पात्र ज्येष्ठ पत्रकारांना द्यावयाच्या आर्थिक सहाय्यामध्ये मासिक रुपये ११,०००/- वरुन रुपये २०,०००/- इतकी वाढ करण्याबाबत शासन निर्णय काढण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई शहरात १३ ते १९ वयाच्या किशोरवयीन मुलांमध्ये टीबी (क्षयरोग) या रोगाची वाढ होत असल्याबाबत

**(५) २०७१२ (०८-०८-२०२३) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात १३ ते १९ वयाच्या किशोरवयीन मुलांमध्ये टीबी (क्षयरोग) वेगाने वाढत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दर महिन्याला रक्त तपासणी करणे, नियमित वैद्यकीय तपासणी करणे आणि आजारी रूग्णांसाठी ऑनलाइन मदत पुरविणेबाबत तसेच मुंबई शहरातील वाढत्या टीबी (क्षयरोग) या संसर्गजन्य रोगाला प्रतिबंध करण्यासाठी शासनस्तरावरुन कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२९-०१-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२) राष्ट्रीय क्षयरोग उन्मुलन कार्यक्रमांतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिका व राज्य शासन यांची संयुक्त मोहिम राबविण्यात येत असून त्याअंतर्गत खालीलप्रमाणे आरोग्य सुविधा पुरविण्यात येतात :-

• निदानाकरीता संशयित रुग्णांचे थुंकीचे नमुने CBNAAT, कल्चर आणि DST तसेच LPA चाचणी करण्यात येतात.

• क्ष-किरण, सीटीस्कॅन, एमआरआय, सोनोग्राफी, Bronchial Lavage या सुविधा एक्स्ट्रा पल्मोनरी टीबीच्या चाचणीकरीता उपलब्ध आहेत.

• औषध संवेदनशील क्षयरोगाकरीता FDC उपचार तसेच औषध प्रतिबंधक क्षयरोगाकरीता Bedaqulin सारखी नवीनतम औषधे इत्यादी उपलब्ध आहे.

• उपचारादरम्यान गुंतागुंतीची शक्यता उद्भवल्यास उपचाराकरीता लागणारे ADR Clinic सर्वसाधारण रुग्णालयांमध्ये उपलब्ध करण्यात आली आहेत.

• खाजगी दवाखाने व रुग्णालयांमध्ये उपचार घेणाऱ्या रुग्णांकरीता सार्वजनिक-खाजगी सहभागांतर्गत सर्व प्रकारच्या चाचण्या, उपचार, नि:शुल्क उपलब्ध करण्यात आले आहेत.

• वाडिया बाल रुग्णालय व जे.जे. रुग्णालय येथे लहान मुलांकरीता विशेष रुग्णसेवा, आंतररुग्ण सेवा तसेच अतिदक्षता विभागाची सोय करण्यात आली आहे.

• शालेय विद्यार्थ्यांची नियमितपणे आरोग्य तपासणी करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील रोजगार हमी योजनेंतर्गत शासन निर्णयात आवश्यक सुधारणा करण्याबाबत

**(६) २०८८९ (२८-०८-२०२३) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही केंद्र शासनाची महत्वाकांक्षी योजना असून या योजनेंतर्गत काम मागणाऱ्या लाभार्थ्यांना अकुशल रोजगार पुरविले जात असून ही योजना संपूर्ण राज्यात लागु करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेत दिनांक २ मे, २०११ च्या शासन निर्णयात दुरूस्ती करून अर्धवेळाचा पूर्णवेळ व आकृतिबंध आराखड्यात समाविष्ठ करून किमान वेतन कायद्याअंतर्गत वैयक्तिक खात्यात मानधन व १००० मनुष्यदिवस निर्मितीच्या वर ६ टक्के अतिरिक्त प्रोत्साहन राशी म्हणून मेहनताना देण्याबाबत ग्राम रोजगार सेवक संघटना महाराष्ट्र (ता.नरखेड जि.नागपूर) यांनी शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त मागणीनुसार शासन परिपत्रकात सुधारणा करून ग्रामीण रोजगार निर्मिती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (२९-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत रोजगार सेवकांच्या मानधनात दिनांक १६ मे, २०२३ अन्वये वाढ करण्यात आली आहे.
(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

## मुंबईसह ठाणे, पालघर, रायगड जिल्ह्यांतील १,५१० मुले शाळाबाह्य असल्याबाबत

**(७) २११३६ (२९-११-२०२३) श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस : तारांकित प्रश्न क्रमांक १९८५७ ला दिनांक १ ऑगस्ट, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिक्षण विभागाने केलेल्या सर्वेक्षणामध्ये मुंबईसह, ठाणे, पालघर, रायगड जिल्ह्यात मिळून सुमारे १,५१० मुले शाळाबाह्य आढळून आल्याचे दिनांक १५ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पालघर जिल्ह्यात ९२८ मुले शाळाबाह्य असल्याचे निदर्शनास आले असून त्यामधील ६७६ मुले डहाणू तालुक्यातील असून सदर शाळाबाह्य मुलांमधील २६३ मुलांना अजुन शाळेतही दाखल करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीच्या अनुषंगाने मुंबईसह ठाणे, पालघर, रायगड जिल्ह्यांतील शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (०४-१२-२०२३) :** (१) ३ ते १८ वयोगटातील शाळाबाहय, अनियमित व स्थलांतरीत बालकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी दिनांक १७ ऑगस्ट, २०२३ ते दिनांक ३१ ऑगस्ट, २०२३ या कालावधीमध्ये राज्यात सर्वत्र सर्वेक्षण राबविण्यात आले. सदर सर्वेक्षणात राज्यात १६२४ मुले व १५९० मुली असे एकूण ३२१४ बालके शाळाबाह्य आढळून आली आहेत. यापैकी मुंबई-३५६, ठाणे-३८०, पालघर-९२८ व रायगड-३८ अशी एकूण १७१० बालके शाळाबाह्य आढळून आली आहेत.
(२) पालघर जिल्ह्यात ९२८ बालके शाळाबाहय आढळून आले असून त्यापैकी सर्वेक्षणाच्या कालावधी मध्ये ७१ बालके व सर्वेक्षणाच्या कालावधी नंतर ९४ अशी एकूण १६५ बालके शाळेत दाखल करण्यात आली आहेत. उर्वरीत ७६३ बालकांना देखील नजीकच्या शाळेत दाखल करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(३) सदर सर्वेक्षणात राज्यात १६२४ मुले व १५९० मुली असे एकूण ३२१४ बालके शाळाबाह्य आढळून आली असून त्यापैकी ८७५ मुले व ७६५ मुली शाळेत दाखल करण्यात आलेली आहेत. उर्वरीत ७४९ मुले व ८२५ मुली अशा एकूण १५७४ बालकांना देखील शाळेत दाखल करण्याची कार्यवाही सुरू असून त्यांनाही लवकरच शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याची कार्यवाही राज्यभरात सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## देसाईगंज (वडसा) (जि.गडचिरोली) येथील सार्वजनिक वितरण प्रणालीच्या गोदामातील तांदळाचा साठा खाण्यास अयोग्य असल्याबाबत

**(८) २१३४१ (२९-११-२०२३) श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देसाईगंज (वडसा)(जि.गडचिरोली) येथे उपविभागीय अधिकारी यांनी दिनांक १४ ऑगस्ट,२०२३ रोजी सार्वजनिक वितरण प्रणालीच्या गोदामात छापा टाकला असता ९१.३ मेट्रिक टन तांदळाचा साठा माणसांनी खाण्यास अयोग्य असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, छापा टाकण्यात आलेल्या सर्व गिरण्यांतील तांदळाचे नमुने येथील प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवले असता ते खाण्यास अयोग्य असल्याचा अहवाल प्रयोगशाळेने पाठविल्यानुसार सहा तांदूळ गिरण्यांना तीन वर्षांसाठी काळ्या यादीत टाकले असून मागील ५ वर्षात गडचिरोलीतील एकूण किती भात गिरण्यांना काळया यादीमध्ये टाकण्यात आले आहे,

(३) असल्यास, देसाईगंज (वडसा) राईस मिल यांनी ९१.३ मेट्रिक टन मानवी खाण्यास अयोग्य तांदळाचा साठा गोठविण्यात आलेला आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार राज्य शासनाच्या पुरवठा विभागाकडून सर्व मिलमधील तांदूळ बदलून घेण्याबाबत जिल्हाधिकारी यांना आदेश दिले असताना अजूनही तांदूळ साठा बदलविण्याबाबत कोणतीही कार्यवाही केली नाही तसेच यात राईस मिलर्सनी या प्रकरणात कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहार करणारे राईस मिल मालक व संबंधित अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (०४-१२-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

उपविभागीय अधिकारी यांनी दिनांक १४ ऑगस्ट, २०२३ रोजी सार्वजनिक वितरण प्रणालीच्या गोदामाची तपासणी केली असता ६०.८२ मे.टन साठा आढळला.

(२) उपविभागीय अधिकारी यांच्या भेटीदरम्यान तपासणीअंती दोषी आढळून आलेल्या देसाईगंज तालुक्यातील १, आरमोरी तालुक्यातील २ व चामोर्शी तालुक्यातील २ अशा एकूण ५ गिरण्यांना ३ वर्षाकरीता काळ्या यादीत टाकण्यात आले आहे.

गडचिरोली जिल्ह्यात मागील ५ वर्षात एकूण १० गिरण्यांना काळ्या यादीत टाकण्यात आले आहे.

(३) केंद्र शासनाच्या SoP नुसार संबंधित गिरणीधारकांकडून नव्याने साठा उपलब्ध करुन घेण्याचे निर्देश गोदाम व्यवस्थापकांना देण्यात आलेले आहेत.

मिलधारकांचा अपील कालावधी संपल्यावर सदर मिलधारकांकडून नव्याने सीएमआर साठा उपलब्ध करून घेण्याची तजबीज ठेवली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शाळांमध्ये राबविण्यात येत असलेल्या "मध्यान्ह शालेय शिक्षण भोजन" योजनेबाबत

**(९) २१३९१ (०५-०१-२०२४) श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या नियमानुसार शाळांमधील विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन देण्यापूर्वी शिक्षकांनी अन्नाचा दर्जा तपासणे व चव चाखणे आवश्यक आहे तसेच त्यांची नोंदीही ठेवणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (१३-०२-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात मराठी भाषेला प्राधान्य देणेबाबत

**(१०) २१४२१ (०५-०१-२०२४) डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षणापासून मनोरंजनापर्यंत मराठी भाषेला कुठेच प्राधान्य दिले जात नसल्याने प्रत्येक ठिकाणी मराठी भाषेला दुय्यम वा तिसरे स्थान मिळत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विविध क्षेत्रात मराठी भाषेला प्राधान्य देणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (१७-०१-२०२४) :** (१) व (२) महाराष्ट्र राज्यातील सर्व शाळांमध्ये मराठी भाषेचे अध्यापन व अध्ययन सक्तीचे करण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरीता "महाराष्ट्र शाळांमध्ये मराठी भाषेचे सक्तीचे अध्यापन व अध्ययन अधिनियम, २०२०" पारीत करण्यात आला आहे. त्यानुषंगाने शालेय शिक्षण विभागाकडून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ व सुधारणा अधिनियम, २०२१ नुसार मराठी ही राज्याची राजभाषा असून वर्जित प्रयोजने वगळता सर्व शासकीय कामकाज मराठीतून करण्याबाबत तरतूदी स्पष्ट करण्यात आलेल्या आहेत.

महाराष्ट्र राज्यातील स्थानिक प्राधिकरणांच्या शासकीय प्रयोजनांसाठी मराठी भाषेचा वापर करण्याकरीता तरतूद करण्यासाठी "महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरणे (राजभाषा) अधिनियम, २०२२" पारीत करण्यात आला आहे.

महाराष्ट्र राजभाषा (सुधारणा) अधिनियम, २०२१ मधील तरतुदीनुसार प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा मराठी भाषा समिती नेमण्यात आली असून सदर समितीमार्फत मराठी भाषेसंदर्भातील तक्रारी/गाऱ्हाणे यांचे निराकरण करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील ब, क आणि ड दर्जाची ग्रंथालये दर्जा वर्ग बदलाच्या प्रतीक्षेत असल्याबाबत

**(११) २१६७६ (०५-०१-२०२४) श्री.प्रसाद लाड, श्री.रमेश कराड, श्री.प्रवीण दटके, श्रीमती उमा खापरे, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक १४६४६ ला दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदान प्राप्त ग्रंथालये शासनाच्या निकषानुसार सभासद संख्या, पुस्तके, वृत्तपत्रे आणि नियतकालिकांच्या संख्येची अट पूर्ण करत असूनही ब, क आणि ड दर्जाची सुमारे १० हजार ९९२ ग्रंथालये दर्जा वर्ग बदलाच्या प्रतीक्षेत असल्याचे दिनांक १३ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत १२ वर्षांपासून १०,९९२ ग्रंथालये दर्जा वर्ग बदलाच्या प्रतीक्षेत असून शासनाने गत १२ वर्षांपासून ग्रंथालयांच्या दर्जा वर्ग न केल्याने या ग्रंथालयांवर उदरनिर्वाह करणारे सुमारे १९ हजार, २४१ ग्रंथालय कर्मचाऱ्यांना तुटपुंज्या पगारावर काम करावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मागील १२ वर्षापासून १०,१९२ दर्जा वर्ग बदलाच्या प्रतिक्षेत असणाऱ्या ग्रंथालयांना दर्जा वर्ग करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (०६-०२-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये ही नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था असून त्यामधील कर्मचारी त्या संस्थांचे कर्मचारी आहेत. ग्रंथालयांमध्ये कर्मचारी नियुक्ती व तद्नुषंगिक सर्व अधिकार संबंधित ग्रंथालय व्यवस्थापनेचे आहेत.

महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये (सहाय्यक अनुदान आणि इमारत व साधनसामग्री यासाठी मान्यता) नियम, १९७० मधील तरतुदींनुसार शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांस परिरक्षण अनुदान मंजूर केले जाते. शासन निर्णय दिनांक २१/१२/२०२२ अन्वये ग्रंथालयांच्या परिरक्षण अनुदानात ६०% वाढ करण्यात आली असून ग्रंथालयाला मिळणाऱ्या परिरक्षण अनुदानातील ५०% रक्कम वेतनासाठी खर्च केली जाते.

(३) उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय दिनांक २१/०२/२०१२ दिनांक २२/०३/२०१३ आणि दिनांक ०७/०६/२०१४ अन्वये सन २०१२-१३ पासून शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना दर्जा वर्ग वाढ देणे ही प्रक्रिया स्थगित असून महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये नियम, १९७० मधील निकषांमध्ये कालानुरूप सुधारणा करण्याची बाब ग्रंथालय संचालनालयाकडून तपासली जात आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गोंडेगाव (ता.मनोरा, जि.वाशिम) येथील शिधापत्रिका धारकांना गत दोन महिन्यांपासून धान्य मिळत नसल्याबाबत

**(१२) २१७८६ (०५-०१-२०२४) श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, प्रा.राम शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.निलय नाईक, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोंडेगाव (ता.मानोरा, जि.वाशिम) येथील शिधापत्रिका धारकांना गत दोन महिन्यांपासून धान्य मिळत नसल्याने त्यांनी तहसिल कार्यालयावर आंदोलन केल्याचे दिनांक १० ऑगस्ट,२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे खरे आहे काय,
(२) असल्यास, गोंडेगाव येथील लाभार्थ्यांना शासनाच्या वतीने देण्यात येणारे गुढीपाडव्याचे किट सुद्धा अद्याप मिळाले नसल्यामुळे याबाबत तहसिलदार यांना निवेदन देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गोंडेगाव येथील शेकडो लाभार्थ्यांना शिधापत्रिकेवरील धान्य तसेच गुढीपाडव्याचे किट तात्काळ उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (२०-०२-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
तहसिलदार, ता.मानोरा यांना दिनांक ०३/०८/२०२३ रोजी निवेदन दिले आहे.
(३) जिल्ह्यामधील मौजे गोंडेगाव ता.मनोरा जि.वाशिम येथील दुकानदाराला अनुज्ञेय अन्नधान्य व “आनंदाचा शिधा” उपलब्ध करून देण्यात आले असून लाभार्थ्यांना वितरीत करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील विनाअनुदानित शाळेतील अनुदानावर येणाऱ्या शाळेची ३० व २० पटसंख्या पेक्षा कमी झालेल्या शिक्षक-शिक्षकेतरांना संरक्षण मिळणेबाबत

**(१३) २१८७७ (२९-११-२०२३) श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विनाअनुदानित त्यानंतर अनुदानावर येणाऱ्या शाळांची पटसंख्या ३० व २० पेक्षा कमी असणाऱ्या शाळांतील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना संरक्षण मिळणे, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळातील विनाअनुदानित त्रुटी पूर्तता केलेल्या शाळा व अंशतः अनुदानित शाळांना रुपये ११६० कोटींचे अनुदान वितरित करण्याबाबतच्या शासन निर्णयामध्ये शहरी भागात शेवटच्या वर्गाची पटसंख्या ३० व ग्रामीण भागातील पटसंख्या २० ग्राह्य धरावे अशी अट आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत २० वर्षापासून या शाळांमधील शिक्षक विनावेतन काम करीत असून ग्रामीण, दुर्गम भागातील शाळांमध्ये निश्चित केलेल्या ३० व २० या पटसंख्येपेक्षा विद्यार्थी संख्या अत्यंत कमी असल्यामुळे सन २०२२ - २३ किंवा या अगोदरच्या संच मान्यतेमध्ये सदर शिक्षक - शिक्षकेतरांची पदे कमी होत असल्याने त्यांना नोकरी गमावण्याचा मोठा धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ज्या शाळांची पटसंख्या ३० व २० पेक्षा कमी आहे अशा शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना संरक्षण देण्याबाबत कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (०१-१२-२०२३) :** (१) होय.

अनुदान मान्यतेकरीता शाळा पात्रतेचे निकष शासन निर्णय, दिनांक २५/११/२०११, दिनांक १६/७/२०१३, दिनांक ४/६/२०१४ व दिनांक १४/८/२०१४ अन्वये निश्चित करण्यात आले असून या निकषांमध्ये पटसंख्येबाबतच्या निकषांचा समावेश आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शाळांना देण्यात येणाऱ्या आरटीई शुल्क प्रतिपूर्तीचे कोटयवधी रुपये थकीत असल्याबाबत

**(१४) २१८८५ (२९-११-२०२३) श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.प्रवीण दटके : तारांकित प्रश्न क्रमांक १९४१८ ला दिनांक २५ जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विद्यार्थ्यांना आर. टी. ई. अंतर्गत खाजगी विनाअनुदानित शाळांमध्ये प्रवेश स्तरावरील विद्यार्थी संख्येच्या कमीत कमी २५ टक्के जागा वंचित आणि दुर्बल घटकांतील मुलांसाठी राखीव ठेवण्याची तरतूद असून खाजगी शांळामध्ये या विद्यार्थ्यांना मोफत शिक्षणाची संधी देण्यात येऊन शाळांमध्ये या २५ टक्के जागांवरील प्रवेशीत विद्यार्थ्यांची शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती शासनाकडून करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर जिल्ह्यातील ६५३ शाळांनी आर. टी. ई. अंतर्गत नोंदणी करुनही अद्यापही परतावा न मिळणे, तसेच आर.टी.ई. प्रतिपुर्तीकरीता अर्थसंकल्पामध्ये मंजूर केलेल्या रुपये २०० कोटीपैकी रुपये ८४ कोटी मिळाले असून उर्वरीत रुपये ११६ कोटी अद्याप मिळाले नसल्याने मराठी व इंग्रजी शाळा संस्था चालकांना अनेक आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा

त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील सर्व आर.टी.ई. प्रतिपुर्ती शाळांना सार्वजनिक वित्तीय प्रबंधन प्रणाली (पि.एफ. एम. एस.) द्वारेच प्रतिपुर्ती देण्याची अंमलबजावणी करून कोरोना कालावधीत इंग्रजी माध्यमातील शाळांनी ऑनलाईन शिक्षण दिले असून यात सचिव स्तरावर ८,०००/- रुपये प्रमाणे प्रतिपुर्तीचा दर ठरवण्याचा आदेश देण्यात आले असून सदर आदेश रद्द करण्याबाबत तसेच राज्यातील टि.सी. विना शिक्षण हा शासन निर्णय इंग्रजी शाळेना लागू करण्यात येऊ नये जेणेकरून काही पालक वर्षभर फी भरण्यास टाळाटाळ करतात व पुढील वर्षी दुसऱ्या शाळेत प्रवेश घेतात, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाकडून परताव्याचे प्रति विद्यार्थी रुपये १७०/- मिळत असून दरवर्षी जिल्ह्यात पाच हजारावर जागा भरल्या जात, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शिक्षण हक्क कायद्यानुसार खाजगी विनाअनुदानित शाळांमध्ये २५ टक्के राखीव जागांवर प्रवेशीत विद्यार्थ्यांची थकीत शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती अदा करण्याबाबत तसेच शाळाबाह्य विद्यार्थ्यासाठी वेगळी नोंदणी करुन टि.सी. विना प्रवेश न देण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (०७-१२-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात शैक्षणिक वर्ष सन २०२२-२३ करीता नागपूर जिल्ह्यास रुपये ५,२०,४५,०००/- इतके अनुदान वितरीत करण्यात आले आहे. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात आरटीईसाठी रुपये २०० कोटी इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. आतापर्यंत रुपये ७६.७५ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला असून उर्वरीत रुपये १२३.२५ कोटी निधी वितरीत करण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आला आहे.
(३) सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या कोरोना कालावधीत रुपये ८०००/- व सन २०२२-२३ करीता रुपये १७,६७०/- प्रती विद्यार्थी शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती दर निश्चित करण्यात आलेला आहे.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या हक्क अधिनियम २००९ मधील कलम ५ (२) व (३) नुसार विद्यार्थ्यांस एका शाळेतून दुसऱ्या शाळेत प्रवेश द्यावयाचा हक्क आहे. त्यामुळे स्वंयअर्थसहाय्यीत शाळांना ही सवलत देता येणार नाही.
(४) नागपूर जिल्ह्यात सन २०२३-२४ या वर्षाकरीता ६५३ शाळांमध्ये ६५७७ जागा राखीव आहेत. ऑनलाईन पदधतीने ३६४९० पालकांनी अर्ज सादर केलेले असून ५७१७ प्रवेश पूर्ण झालेले आहे.
(५) शाळाबाह्य बालकांना शिक्षण हक्क कायदा, २००९ चे कलम चार नुसार वयानुरू प्रवेश देण्याची कार्यवाही नियमितरित्या करण्यात येते.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात पिंपळस, वाकडी व रामपूरवाडी (ता.राहता, जि.अहमदनगर) या तीन गावामध्ये स्वतंत्र स्वस्त धान्य दुकान सुरु करण्याबाबत

**(१५) २१९८७ (०५-०१-२०२४) प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.निलय नाईक, श्री.रामदास आंबटकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळस, वाकडी व रामपूरवाडी (ता.राहता, जि.अहमदनगर) या तीन गावांमध्ये एकच स्वस्त धान्य दुकान असल्याने शिधावाटप करताना मोठ्या रांगा लागून रेटारेटी झाल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्येक गावात स्वतंत्र स्वस्त धान्य दुकान देऊन सर्वांना रेशनचे धान्य वेळेत देण्यासाठी तसेच रेशन दुकानदारांचे कमिशन वाढवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (२१-०२-२०२४) :** (१) व (२) नाही.

जिल्हा पुरवठा कार्यालय, अहमदनगर यांच्याकडून जिल्ह्यातील रद्द, राजीनामा दिलेल्या ठिकाणी जाहीरनामा दिनांक १/०७/२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने मौजे पिंपळस या ठिकाणी चेअरमन, विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी मर्या, पिंपळस यांना दुकान मंजूर करण्यात आलेले आहे.

मौजे वाकडी या ठिकाणी एकूण ४ स्वतंत्र रास्त भाव दुकाने कार्यरत आहेत.

मौजे रामपूरवाडी येथे महीला औदयोगिक संस्था या नावाने स्वतंत्र रास्त भाव दुकान कार्यरत आहे.

मौजे पिंपळस, वाकडी व रामपूरवाडी हे तीन गाव स्वतंत्र असून तिन्ही ठिकाणी स्वतंत्रपणे शिधापत्रिकाधारकांना अन्नधान्य वितरण करण्यात येते.

राज्यातील रास्त भाव दुकानदारांना प्रति क्विंटल रु.१५०/- इतके मार्जिन/कमिशन त्यांच्या खात्यात अदा करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई-नाशिक महामार्गावर ठाणे खाडीवरील साकेत उड्डाणपुलाच्या बेअरिंगचा भाग निखळल्याने वाहतुकीस धोका निर्माण झाल्याबाबत

**(१६) २२११० (०५-०१-२०२४) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.प्रविण पोटे-पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-नाशिक महामार्गावर ठाणे खाडीवरील महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या साकेत उड्डाणपुलाच्या बेअरिंगचा भाग निखळल्याने वाहतुकीस धोका निर्माण झाला असून सदर पुलावरुन एकेरी वाहतूक सुरू ठेवण्यात आल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू एकेरी वाहतुकीमुळे प्रचंड वाहतूक कोंडी निर्माण होऊन नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त पुलाची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०५-०२-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे. तथापि, दिनांक २३/०८/२०२३ रोजी मुंबई नाशिक महामार्गावरील साकेत खाडी पुलावरचा बेअरिंगचा भाग निखळल्याने वाहतुकीस धोका निर्माण झाला, हे खरे नाही. पुलाच्या एका ठिकाणी निखळलेल्या बेअरिंगच्या वरील बिमच्या भागाची दुरुस्ती करण्यासाठी काही काळासाठी मुंबई-नाशिक महामार्गाची जड वाहनांची रहदारी वळविली होती, हे खरे आहे.
(२) नाशिक-मुंबई मार्गावरील दोन्ही लेन नेहमीप्रमाणेच सुरु होत्या. मुंबई-नाशिक मार्गावरील रहदारी एका लेनवरुन सुरु होती. तथापि, दिनांक २५ व २६ ऑगस्ट, २०२३ रोजी रात्री १२ ते सकाळी ६ च्या दरम्यान रहदारी दुसऱ्या बाजूने वळविली होती.
(३) दिनांक २३/०८/२०२३ ते दिनांक २६/०८/२०२३ पर्यंत सदर ठिकाणी मुंबई-नाशिक लेनवरील पुलाच्या मध्यभागातील एका ठिकाणी निखळलेल्या बिमचा भाग दुरुस्त केला व दिनांक २७/०८/२०२३ रोजी रहदारी पूर्ववत सुरु करण्यात आली.
(४) प्रश्न उद् भवत नाही.

---

## नागपूर जिल्ह्यात शालेय शिक्षण विभागात माहिती संकलनासाठी टॅबलेट उपलब्ध करून देण्यात आल्याबाबत

**(१७) २२३७८ (२१-११-२०२३) श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्ह्यात शालेय शिक्षण विभागात नविन तंत्रज्ञानाच्या युगात डिजीटल पध्दतीने माहिती संकलनासाठी जिल्ह्यातील १३० केंद्र प्रमुखांना २० लाख रुपयांचे टॅबलेट गतवर्षी उपलब्ध करून देण्यात आले असून उक्त टॅबलेटमार्फत सर्व केंद्रातून वेळेच्या आत माहिती संकलनाचे काम होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सेवानिवृत्तपूर्वी झालेल्या केंद्रप्रमुखांनी /गटशिक्षणाधिकारी यांनी सदरचे टॅबलेट परत करणे आवश्यक असूनही त्यांनी ते परत केले नसल्यामुळे त्यांच्या जागेवर येणाऱ्या शिक्षकांना अडचणी येत असून टॅबलेट सेवानिवृत्त केंद्रप्रमुख /गटशिक्षणाधिकारी यांचेकडून परत घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (०७-१२-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर येथील दुध डेअरी सबडिव्हीजन, रविनगर कॉटेज व उप जिल्हाधिकारी निवास यांच्या दुरुस्तीवर मंजुरी नसताना खर्च करण्यात आल्याबाबत

**(१८) २२३८३ (०५-०१-२०२४) श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०२२ च्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनादरम्यान रविभवन, नागभवन, १६० खोल्यांचे गाळे व हैद्राबाद हाऊस या सर्व इमारतींच्या दुरुस्तीकरीता मंजूर असलेल्या रकमेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मंजूर असलेल्या खर्चाच्या रकमेतून मंजुरी नसतानाही दुध डेअरी सबडिव्हीजन, रविनगर कॉटेज व उप जिल्हाधिकारी निवास यांच्या दुरुस्तीवरही खर्च करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दुध डेअरी सबडिव्हीजन, रविनगर कॉटेज व उप जिल्हाधिकारी निवास यांच्या दुरुस्तीकरीता मंजुरी नसतानाही दुरुस्ती करणाऱ्या संबंधित दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच सदर अधिकारी व कर्मचारी यांच्यांकडून मंजुरी नसतानाही खर्च करण्यात आलेली रक्कम वसुल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण (३०-०१-२०२४) :** (१) हे खरे नाही.

इमारतींच्या दुरूस्तीकरीता करण्यात आलेला खर्च कामांसाठी मंजूर किमतीच्या मर्यादेतच करण्यात आलेला आहे.

(२) हे खरे नाही.

सन २०२२ च्या हिवाळी अधिवेशनामध्ये दूध डेअरी सबडिव्हीजन व उप जिल्हाधिकारी निवास यांच्या दुरूस्तीवर खर्च करण्यात आलेला नव्हता.

तथापि, नागपूर येथील हिवाळी अधिवेशनाकरीता येणाऱ्या मंत्रालयीन अधिकारी व कर्मचारी यांची राहण्याची व्यवस्था करण्याकरीता निवास स्थानाची कमतरता भासते. त्यानुसार अतिरिक्त निवासस्थाने उपलब्ध करण्याच्या दृष्टीने विधीमंडळ अधिवेशन निवासव्यवस्था समितीच्या बैठकीतील निर्णयानुसार शासकीय दुध योजना परिसर, उपजिल्हाधिकारी येथील निवासस्थाने व रविनगर कॉटेज सुव्यवस्थित ठेवण्याकरीता वसाहतीतील कामांना मान्यता प्रदान करून हिवाळी अधिवेशन २०२३ करीता वसाहतीतील निवासस्थाने सुसज्ज करण्यात आलेली आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई येथील सिद्धार्थ महाविद्यालयाच्या टी.वाय.बी.कॉमच्या परिक्षेपूर्वीच उत्तरपत्रिका समाजमाध्यमांवर प्रकाशित झाली असल्याबाबत

**(१९) २२४७६ (२९-११-२०२३) श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुबईतील सिध्दार्थ महाविद्यालयात मुंबई विद्यापीठाकडून घेण्यात येणाऱ्या टी.वाय.बी.कॉम (सत्र ५) च्या परीक्षा सुरु असून परिक्षेपूर्वीच उत्तरपत्रिका समाजमाध्यमांवर (व्हॉटस अप) प्रकाशित झाली असल्याचे दिनांक ३ नोव्हेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर परिक्षेच्या वेळी नेमणूक करण्यात आलेल्या पर्यवेक्षकाने परीक्षा हॉलमध्ये विद्यार्थ्यांच्या फोनमधील व्हॉटस अपवर कॉमर्स पाच या विषयाची प्रश्नपत्रिका आणि ऑब्जेक्टिव्ह प्रश्नांची उत्तरे असल्याचे सदर परीक्षा हॉलमधील पर्यवेक्षकाच्या निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर विद्यार्थ्यांचा फोन ताब्यात घेतला असता परिक्षार्थीकडील मोबाईल फोन मध्ये मिळून आलेली प्रश्नपत्रिका यांच्यावरील वॉटरमार्क नंबर या परीक्षा केंद्राचा नसून अन्य परीक्षा केंद्राचा असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (०७-१२-२०२३) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

मुंबई विद्यापीठाकडून टी.वाय. बी.कॉम कॉमर्स पेपर ५ या विषयाची परीक्षा दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२३ रोजी सकाळी १०.०० ते दु/०१/३० या वेळेत घेण्यात आली होती. मुंबईतील सिद्धार्थ वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय या परीक्षा केंद्रावर कार्यरत पर्यवेक्षकाने परीक्षार्थी विद्यार्थ्याचा भ्रमणध्वनी तपासला असता त्यामध्ये या विषयाची प्रश्नपत्रिका असल्याचे निदर्शनास आले होते. विद्यापीठाकडून या गैरप्रकरणाबाबतचे दस्तऐवज सिद्धार्थ वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालयाकडून ई मेलद्वारे मागविण्यात आले असता सदर भ्रमणध्वनीमध्ये असलेल्या प्रश्नपत्रिकेचा वॉटरमार्क हा अन्य परीक्षा केंद्राचा असल्याचे निदर्शनास आले आहे.
(४) सदर प्रकरणी सिद्धार्थ वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालयाकडून आझाद मैदान पोलीस ठाणे, मुंबई येथे संबंधिताविरुध्द तक्रार दाखल केली असून सदर प्रकरणाची चौकशी प्रक्रिया पोलीसांकडून सुरु आहे.

विद्यापीठाकडून सदर प्रकरण विद्यापीठाच्या अवैध साधन चौकशी समितीपुढे दिनांक १८ नोव्हेंबर, २०२३ च्या बैठकीत ठेवण्यात आले असता समितीने केलेल्या शिफारशीनुसार भ्रमणध्वनीमध्ये आढळून आलेली प्रश्नपत्रिका ज्या परीक्षाकेंद्राची होती ते परीक्षा केंद्र पुढील दोन वर्षासाठी प्रतिबंधित करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पालघर जिल्ह्यातील ४४३ जिल्हा परिषदेच्या शाळांचा विद्युत पुरवठा बंद करण्यात आल्याबाबत

**(२०) २२४७९ (२१-११-२०२३) श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघरमध्ये जिल्हा परिषदेच्या ४४३ शाळांचा विद्युत पुरवठा विद्युत देयके न भरल्यामुळे बंद करण्यात आला असल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ च्या अंतिम आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज पुरवठा खंडित करण्यात आलेल्या शाळांमध्ये विक्रमगड तालुक्यातील ५३, पालघर १३, जव्हार ९१, मोखाडा ६७, डहाणू ८०, तलासरी ६४, वाडा ६८, वसई ७ शाळांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यापैकी अनेक गावांमध्ये लोकसहभागातून शाळा डिजिटल करण्यात आल्या असल्या तरी विद्युत पुरवठा खंडित करण्यात आला असल्याने विद्यार्थ्यांच्या ज्ञानार्जनात अडथळा निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे चौकशीच्या अनुषंगाने पालघर जिल्हा परिषदेच्या ४४३ शाळांतील विदयुत पुरवठा सुरळीत करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (०७-१२-२०२३) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

पालघर जिल्ह्यामध्ये विद्युत देयके न भरल्याने एकूण ४७२ जिल्हा परिषद शाळांचा विद्युत पुरवठा खंडीत करण्यात आला आहे.

(३) व (४) राज्यातील जिल्हा परिषदांच्या माहे मार्च, २०२३ ते सप्टेंबर, २०२३ या कालावधीतील थकीत वीज देयकांकरीता रुपये ६.७९ कोटी निधी आवश्यक असल्याचे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने कळविले असून, त्यानुसार सदर रक्कम दिनांक २२/११/२०२३ च्या शासन निर्णयाद्वारे वितरीत करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे समग्र शिक्षा कार्यक्रमांतर्गत रुपये १८.३९ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

पालघर जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांच्या थकीत वीज देयकाचा भरणा दिनांक २२/११/२०२३ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे वितरीत निधीमधून करण्यात येणार असून समग्र शिक्षा अंतर्गत भौतिक सुविधा व अन्य आवर्ती खर्चासाठी रुपये ५८.०५ लक्ष इतका निधी पालघर जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांकरीता वितरीत करण्यात आला आहे.

तसेच, राज्यातील शासकीय शाळांमधील बंद वीज पुरवठा सुरु ठेवण्याबाबत मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांचे स्तरावर बैठक दिनांक ०३/११/२०२३ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थाच्या सुरु असलेल्या प्राथमिक शाळांचा विद्युत पुरवठा खंडीत करु नये, यासाठी या शाळांची यादी १० दिवसात महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीला देण्याच्या सूचना शिक्षण संचालक (प्राथमिक), म.रा., पुणे यांना देण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे कोणत्याही परिस्थितीत शासकीय शाळांची वीज जोडणी खंडीत करण्यात येऊ नये अशा सूचना महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीला दिल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.